# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/अभि. धा. क्र. ३८/निवडणूक निधी/पो.बं. खर्च/ 18246 /२०१७. दिनांक : ७/१२/२०१७.

## -: परिपत्रक :-

**विषय :- पोलीस बंदोबस्त खर्च निवडणूक खर्चातून वगळणे बाबत...**

**संदर्भ** :- १. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. १०१५/सन २०१४, दिनांक ९.१२.२०१४

२. या प्राधिकरणाकडील आदेश ८११३/सन २०१५, दिनांक १.१०.२०१५

३. या पाधिकरणाकडील आदेश जा.क्र. ६७७५/सन २०१६, दिनांक १६.११.२०१६.

प्राधिकरणाने संदर्भ क्रमांक १ च्या आदेशानुसार संस्थेची सभासद संख्या, उलाढाल, गाळप क्षमता, कार्यक्षेत्र विचारात घेऊन संबंधीत संस्थांकडून उचल करावयाच्या कमाल निवडणूक निधीचे दर निर्धारीत केलेले आहेत. त्या अनुसार संस्थेने निवडणूक निधी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे जमा करणे अनिवार्य आहे. अपवादात्मक परिस्थितीत कमाल निवडणूक निधीपेक्षा जास्त निवडणूक निधी लागणार असल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अंदाजीत खर्चाच्या समर्थनीय कारणासह तपशीलवार प्रस्ताव जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर करुन जादा निवडणूक निधी संबंधीत संस्थांकडून उचल करण्यास जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांची परवानगी घेणे बंधनकारक आहे. सदरची परवानगी निवडणूक प्रक्रिये दरम्यान घेणे बंधनकारक असल्याने त्याचा निवडणूक कामकाजावर परिणाम होत असल्याचे प्राधिकरणाच्या निर्दशनास आले आहे.

तसेच प्राधिकरणाने संदर्भ क्रमांक १ च्या आदेशानुसार २८ बाबींकरीता खर्च करण्याची अनुमती निवडणूक निर्णय अधिकारी यांना दिलेली आहे. सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया हया संवेदनशील असून काही प्रसंगी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उदभवत असल्यामुळे निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी पोलीस बंदोबस्त घेणे अनिवार्य होते. त्यामुळे प्राधिकरणाने पोलीस बंदोबस्त खर्च करण्यास अनुमती दिलेली आहे. त्यानुसार संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी गृह विभागाकडे पोलीस बंदोबस्ताची मागणी करतात तेव्हा संबंधीत गाव/वार्डतील गुन्हेगारी स्वरुप विचारात घेऊन कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी संबंधीत विभागाकडून पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वाटप केले जाते व अशा बंदोबस्ताकरीता होणाऱ्या खर्चाची आकारणी केली जाते. आकारणी केलेला खर्च अदा केल्यानंतरच पोलीस बंदोबस्त उपलब्ध केला जात असून सदरच्या खर्चाचे प्रमाण संस्थेच्या निवडणूकीतील संवेदनशीलतेनुसार कमी अथवा जास्त होत असल्याचे प्राधिकरणाच्या निदर्शनास आले आहे. वस्तुत: सदरचा खर्च कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी थेट शासनाच्या कोषागारात जमा केलेला अपरिहार्य खर्च आहे. परिणामी प्राधिकरणाकडील संदर्भ क्रमांक २ च्या आदेशाचे निर्धारीत केलेल्या खर्च मर्यादेबाबत संबंधीत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडून काटेकोर पालन होत नाही. तसेच प्राधिकरणाने संदर्भ क्रमांक ३ च्या आदेशानुसार पोलीस बंदोबस्त खर्चाशिवाय पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना मतदान व मतमोजणी दिवशी जेवण खर्च प्रती व्यक्ती प्रती दिन रु. १५०/- अनुज्ञेय केलेला आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१३) व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (v), (vi) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण निवडणूक खर्चातील पोलीस बंदोबस्त खर्चाबाबत खालील प्रमाणे निर्देश पारीत करीत आहे.

१. पोलीस बंदोबस्त उपलब्धते बाबत संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी गृह विभागाकडे मागणी करावी. गृह विभागाने आकारणी केलेला पोलीस बंदोबस्त खर्च संबंधीत संस्थेने निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या आदेशानुसार थेट गृह विभागास अदा करुन सदरचा जमा खर्च संस्थेच्या दप्तरी दाखवावा.

२. संस्थेने गृह विभागास अदा केलेला पोलीस बंदोबस्त खर्चाचा समावेश निवडणूक खर्चात करु नये. तथापि संस्थेने अदा केलेल्या रक्कमांचे देयकांची साक्षांकीत प्रत प्रस्तावासोबत सादर करण्यात यावी.

३. गृह विभागाने निश्चित केलेल्या दराप्रमाणे संस्थेने रक्कमा अदा केल्यानंतर पुन्हा प्रत्यक्ष हजर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दुबार मानधन देऊ नये.

४. मतदान व मतमोजणीवेळी पोलीस बंदोबस्ताकरीता हजर असलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांकरीता जेवण खर्च रु. १५०/- प्रती व्यक्ती प्रती दिन अनुज्ञेय राहील.

५. पोलीस बंदोबस्ताकरीता हजर असलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांकरीता झालेला जेवण खर्च संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी करणे आवश्यक असून सदरच्या खर्चाचा समावेश निवडणूक खर्चात करावा. सदरचा चहा/नाष्टा/जेवण खर्च संस्थेने परस्पर करुन नये.

६. संबंधीत सहकारी संस्थांच्या निवडणूकीसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या सुचनेप्रमाणे आवश्यक पोलीस बंदोबस्तासाठी शासनाकडे अनुज्ञेय रक्कमा जमा करणेची जबाबदारी सर्वस्वी संबंधीत संस्थेच्या पदाधिकारी व कर्मचारी यांची असेल.

७. पोलीस बंदोबस्ताकरीता आवश्यक निधी जमा करण्यात कसुर झाल्यामुळे निवडणूकीदरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यास संबंधीत जबाबदार राहतील.

सदरच्या परिपत्रकीय सुचना आपले अधिनस्त सर्व सहकारी संस्थांचे विशेषत्वाने निवडणूक पात्र सहकारी संस्थांचे निदर्शनास आणून देण्यांची जबाबदारी सर्वस्वी जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसह निवडणूक निर्णय अधिकात्यांची असेल.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, म. रा. पुणे यांच्या आदेशाने.**

०८/१२/१८

(यशवंत गिरी)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत,**

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)